दि.११/१०/२०१८ चे
बैठकीचे इतिवृत्त

जा.क्र.मुं.मं./का.अ./बीडीडी/ ९६७/२०१८
दिनांक : 20/10/२०१८

विषय :- बीडीडी चाळीतील भाडेकरुंच्या प्रश्नांचे निरसन करुन बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प लवकर मार्गी लागण्याच्या दृष्टीने मा.सभापती मुंबई मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दि.११/१०/२०१८ रोजी दु.०३.०० वाजता झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस खालील सन्मानीय लोकप्रतिनिधी, अधिकारी व विविध बीडीडी चाळ संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मधु चव्हाण | - मा.सभापती मुंबई मंडळ |
| २. | श्री. कालीदास कोळंबकर | - मा. आमदार वडाळा विधानसभा |
| ३. | श्रीमती उर्मिला पांचाळ | - मा. नगरसेविका |
| ४. | श्री. सुनिल राणे | - मा. सरचिटणीस , भाजप , मुंबई विभाग |
| ५. | श्री. दीपेन्द्र सिंह कुशवाह | - मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ |
| ६. | श्री. संजय लाड | - मुख्य अभियंता -२ / प्रा. |
| ७. | श्री. धिरजकुमार पंदिरकर | - उपमुख्य अभियंता / बीडीडी / मुं.मं. |
| ८. | श्री. एस. एस. कोन्नूर | - कार्यकारी अभियंता / बीडीडी / मुं. मं. |
| ९. | श्री. राजीव शेट | - कार्यकारी अभियंता / बीडीडी नि. / प्रा. |
| १०. | श्रीमती वैशाली गडपाले | - मुख्य जनसंपर्क अधिकारी, प्राधिकरण |
| ११. | श्री. के.पी. जनबंधू | - संचालक, बीडीडी चाळ व कार्यकारी अभियंता (सा.बां.विभाग) |
| १२. | श्री. अनिल कानिटकर | - बीडीडी वसाहत व्यवस्थापक, बीडीडी चाळ व उपअभियंता (सा.बां.विभाग) |
| १३. | श्रीमती माधवी सुर्वे | - सहाय्यक कामगार कल्याण आयुक्त |
| १४. | श्रीमती अंजली भोसले | - उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) धारावी तथा सक्षम प्रा. नायगांव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प |
| १५. | श्री. अशोक मुंडे | - उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाबा तथा सक्षम प्रा.ना.म.जोशी मार्ग व वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प |
| १६. | श्रीमती जयश्री खाडीलकर | - संपादिका, नवाकाळ |
| १७. | श्री. किरण माने, श्री. रमेश जगताप , श्री. कृष्णकांत नलगे व इतर बीडीडी चाळ पुनर्विकास कृती समितीचे पदाधिकारी | |
| १८. | श्री. दिपक पाटील | - रहिवाशी, वरळी बीडीडी चाळ |

बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्प, नायगांव, ना.म.जोशी मार्ग - लोअर परेल व वरळी परिसरातील विविध संघटनांचे प्रतिनिधी व स्थानिक रहिवाशी

बीडीडी चाळीतील भाडेकरुंच्या प्रश्नांचे निरसन करुन बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प लवकर मार्गी लागण्याच्या दृष्टीने बीडीडी चाळ पुनर्विकास कृती समितीच्या व नायगांव बीडीडी फेडरेशनच्या दि.२६/०९/२०१८ रोजीच्या विनंती अर्जावर मा. सभापती मुंबई मंडळ यांनी संयुक्त बैठक आयोजित करण्याबाबत निर्देश दिले होते

व या निर्देशास अनुसरुन मा.सभापती मुंबई मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दि.११/१०/२०१८ रोजी दु.०३.०० वा. बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीत लोकप्रतिनिधी बीडीडी चाळ पुर्नविकास कृती समितीने व रहिवाशांनी उपस्थित केलेल्या मुद्दांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व त्याबाबत मा. सभापती, मुंबई मंडळ यांचे निर्देश पुढील तत्क्यात नमूद केले आहेत.

| अ. क्र. | प्रकल्पांबाबत उपस्थित मुद्दे | मा. सभापती यांचे निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १. | प्रत्येक भाडेकरुबरोबर पुर्नविकासासाठी घर खाली करण्यापूर्वी रीतसर कायदेशीर करार केल्यानंतर सर्वांना संक्रमण शिबीरात हलविण्यात यावे. | जुन्या चाळींतील गाळा रिक्त करण्यापूर्वी म्हाडा व पात्र भाडेकरु यांच्यामध्ये संक्रमण गाळयासाठी कायदेशीर करारनामा पंजीकृत करण्यात येईल. | मुंबई मंडळ |
| २. | रेरा अंतर्गत सदर प्रकल्प रजिस्टर करुन त्यामार्फत अतिरिक्त मिळणा-या १५ चौ. फूट जागेची रक्कम भाडेकरुंना देण्यात येणा-या कॉर्पस फंडामध्ये वाढवून मिळावी. | प्रकल्पातील पुनर्वसन घटकाचे रेरा अंतर्गत पंजीकृत करणे कायदयानुसार बंधनकारक नाही. विक्री घटकांचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी रेरामध्ये नोंदणी करण्यात येईल. प्रचलित वि.नि.नि. (३३)(९)(ब) नुसार ५०० चौ. फूटांचे चटई क्षेत्र असलेला पुनर्वसन गाळा अनुज्ञेय आहे. रेरामध्ये नोंदणी केल्यामुळे अतिरिक्त जागा मिळणार नाही. | ------ |
| ३. | शासनाने जी. आर. काढून सर्व्हे करताना भाडेकरुने ०१.०१.२०१७ ते २८/०६/२०१७ कालावधीमील भाडे बील व विदयुत बील दयावयाचे आहे. विकास विभाग कार्यालयातून १९९६ साली ती खोली अस्तित्वात असून त्यात त्यावेळचे भाडेकरु रहात असल्याचे पुरावे परस्पर उपजिल्हाधिकारी यांना देणे, जेणेकरुन कोणताही लाभार्थ्यी अपात्र होणार नाही. | गृहनिर्माण विभागाच्या दि. २४/०४/२०१८च्या शासन निर्णयानुसार संचालक / बीडीडी कार्यालयाकडून सन १९९६ पूर्वीचे पुरावे, कागदपत्रे व इतर काही कागदपत्रे सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे व त्यानुसार सध्या कार्यवाही होत आहे. | संचालक. बीडीडी चाळ सक्षम प्राधिकारी नायगांव बीडीडी चाळ तथा उपजिल्हाधिकारी ( अति./निष्का.) धारावी विभाग सक्षम प्राधिकारी ना.म.जोशी मार्ग बीडीडी चाळ तथा उपजिल्हाधिकारी ( अति. /निष्का.) कुलाबा विभाग |
| ४. | बीडीडी चाळ पुर्नविकास कृती समितीमधील सर्व संघटनांचे प्रतिनिधी स्वत: भाडेकरु व रहिवाशी असल्यामुळे त्यांच्याशी निगडीत सर्व धार्मिक स्थळे, सामाजिक स्थळे, मैदाने यांचा पुर्नविकास प्रकल्पाच्या प्लानमध्ये समावेश झाला पाहिजे. | सदरील बाबी मंजूर प्रकल्प आराखडयात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. | मुंबई मंडळ |

| अ. क्र. | प्रकल्पांबाबत उपस्थित मुद्दे | मा. सभापती यांचे निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| ५. | शासकीय नियमाप्रमाणे ज्यांनी खोल्यांचा विक्री व्यवहार करुन खोल्या घेतल्या आहेत फक्त त्यांनाच रु. १२,५००/- ते रु. २२,५००/- भरावयाचे असुन त्याबाबतचे हस्तांतर शुल्क भरल्याची पावती सादर करावयाची आहे. भाडेकरुंनी १९९६ चा कोणताही पुरवा दयावयाचा नाही. पैसे भरुन पात्र करण्याची पध्दत नाहीच. शासनाने पात्रता कार्यवाही करण्याचे काम उपजिल्हाधिकारी यांना दिले असून त्यासाठी सादर करावयाचे भाडे पावती, हस्तांतरण पत्र, भाडेकरु करारपत्र त्यांनी पीडब्ल्यूडी कडूनच दयावयाच्या आहेत. म्हाडाने या दोन्ही गोष्टींकडे लक्ष दयावे. | गृहनिर्माण विभागाच्या दि. २४/०४/२०१८ च्या शासन निर्णयामध्ये याबाबत स्पष्टता आहे. | संचालक. बीडीडी चा सक्षम प्राधिका नायगांव बीडीडी चा तथा उपजिल्हाधिकारी ( अति./निष्का.) धारा विभाग, सक्षम प्राधिकार ना.म.जोशी मार्ग बीडी चाळ तथ उपजिल्हाधिकारी ( अति./निष्का.) कुला विभाग |
| ६. | शिवडी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प वरळी, नायगांव व डिलाईल प्रकल्पासोबतच व्हावा. | शिवडी बीडीडी चाळ ही मुंबई बंदर न्यासाच्या जागेवर असल्याने प्रकल्प सुसासध्यता अहवाल दि. १६/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये म्हाडाने मुंबई बंदर न्यास (एमबीपीटी ) ला पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आहे. सदरील अहवाल मुंबई बंदर न्यास केंद्रशासनास मान्यतेसाठी सादर करणार आहे. केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्प अंमलबजावणी बाबत आवश्यक कार्यवाही म्हाडा मार्फत करण्यात येईल. | मुंबई बंदर न्यास |
| ७. | प्रत्येक विभागात २०११ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडया त्याच ठिकाणी सर्व सुखसोयींसह शासकीय नियमाप्रमाणे प्रत्येक झोपडपट्टीधारकास घर मिळाले पाहिजे. | ना. म. जोशी , नायगांव व वरळी येथील पात्र झोपडपट्टीधारकांना प्रचलित नियमावलीनुसार पुनर्वसन गाळा वितरित करण्यात येणार आहे. परंतु सदर तीनही ठिकाणी झोपडपट्टी धारकांची संख्या कमी असल्याने नियोजनाच्यादृष्टीने प्रकल्प सुसाध्य करण्यासाठी पात्र झोपडपट्टीधारकांसाठी एक पुनर्वसन इमारत वरळी येथे बांधण्यात येणार आहे. | मुंबई मंडळ |

| अ. क्र. | प्रकल्पांबाबत उपस्थित मुद्दे | मा. सभापती यांचे निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| ८. | कॉर्पस फंडाबाबत मेंटेनन्ससाठीचा १० वर्षांचा कालावधी टेलिस्कोपिक पध्दतीने फ्री मेंटनन्स मुदत संपल्यानंतर मेंटेनन्ससाठी भाडेकरुंना परवडणारी आकारणी ठेवाही. १० वर्षे कालावधीच्या फ्री मेंटेननसची मुदत वाढवून ती २० वर्षापर्यंत करावी जेणेकरुन भाडेकरु आहे त्या ठिकाणी मुंबईतच राहील. | वि.नि.नि. (३३)(९)(बी) मधील मुद्दा क्र. १५ नुसार पुनर्वसन इमारतीची पुढील १० वर्षे देखभाल करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद म्हाडा करणार आहे. | मुंबई मंडळ |
| ९. | विभागातील ज्या स्टॉलधारकांचे सर्व्हे झाले आहेत त्यांना व शासनाने जाहीर केल्याप्रमाणे २०११ पर्यंतच्या सर्वांना संरक्षण देऊन त्यांनाही पुनर्विकासात सामावून घ्यावे. | प्रचलित शासन नियमावली वि.नि.नि.३३ (९) (ब) व दि.१६/०५/२०१५ रोजीच्या शासननिर्णयानुसार पात्र स्टॉल धारकांचे पुनर्वसन त्याच बीडीडी परिसरात केले जाईल. पुनर्वसन इमारतीत स्टॉल्सची जागा मुख्यत्वे तळ मजल्यावर राहिल. | ---------------- |
| १०. | पोलीस कर्मचा-यांना शासनाने जाहीर केलेली ३० वर्षांची अट शिथील करुन त्यांनाही शासकीय नियमाप्रमाणे पुनर्विकासात सामावून घ्यावे. | गृहनिर्माण विभागाच्या दि. ३०/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार पोलीस निवासस्थानाऐवजी बांधण्यात आलेले पुनर्वसन गाळे गृह विभाग / पोलीस विभागाला म्हाडामार्फत हस्तांतरित करण्यात येतील. | ---------------- |
| ११. | बीडीडी चाळीत असलेल्या व्यापारी गाळयांबाबत निवासी भाडेकरुंप्रमाणेच समाधान होईल असे क्षेत्रफळ जाहीर करुन त्यांनाही पूर्ण सुरक्षितपणे पुनर्विकास प्रकल्पात सामावून घ्यावे. | बीडीडी चाळीत असलेल्या व्यापारी गाळयांचे प्रचलित नियमावलीनुसार पुनर्वसन केले जाईल. व अनुज्ञेय क्षेत्रफळ वि.नि.नि.३३ (९) (ब) नुसार असेल. | ---------------- |
| १२. | विकास विभाग कार्यालयातून हस्तांतरण प्रक्रिया युध्दपातळीवर करण्यात यावी. अदयापही जे भाडेकरु मयत झाले आहेत त्यांच्या वारसांनी किंवा इतरांनी हस्तांतरणासाठी प्रक्रिया केली नसेल त्यांनी सध्याच्या कालावधीत हस्तांतरणसाठी कागदपत्र सादर केल्यानंतर अशा सर्वांना ०१/०१/२०१७ ते २८/०६/२०१७ ची | गृहनिर्माण विभागाच्या दि. २४/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार दि. १२/१२/१९९४ ते २८/०६/२०१७ या कालावधीत झालेल्या भाडेदारीच्या अनधिकृत हस्तांतरण (Transfer) प्रकरणामध्ये ( वारसा हक्क / नातेवाईक तसेच शासन / मा. न्यायालयाने विशिष्ट प्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार झालेली | संचालक, बीडीडी चाळ |

| अ. क्र. | प्रकल्पांबाबत उपस्थित मुद्दे | मा. सभापती यांचे निर्देश | संबंधित विभाग |
| --- | --- | --- | --- |
| | कटऑफ तारीख न घेता त्या सर्वांचे पुढील काळातील हस्तांतरण आदेश प्राप्त झाल्याची दिनांक मान्य करावी. | हस्तांतरण प्रकरणे वगळून अन्य सर्व हस्तांतरण प्रकरणे) संबंधित गाळयातील सध्याच्या भाडेकरुकडून दंडात्मक शुल्क स्वीकारण्यात यावे. वारसा हस्तांतरण प्रकरणांमध्ये अशी कोणतीही कट ऑफ तारीख नाही. | |
| १३. | शासन निर्णय २०१६/ प्र.क्र.२६१ / गृनिप अन्वये दिलेल्या निर्णयानुसार भाडेकरुंची प्रारुप यादी विकास चाळी यांच्या मार्फत सक्षम प्राधिकारी यांना देण्यात यावीत. तरी या नियमाचा अंर्तभाव वगळून काही भाडेकरुंना अपात्र घोषित करण्यात आले. त्यामुळे तमाम भाडेकरुंच्या मनात संभ्रम निर्माण होऊन पुढील पुर्नविकासाच्या सर्वेक्षणात खिळ बसली याबाबींचा जरुर विचार करावा. | गृहनिर्माण विभागाच्या दि.२४/०४/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांचे मार्फत पात्रता निश्चितीची कार्यवाही करण्यात येईल. | ---------------------- |
| १४. | उद्वाहन (लिफ्ट) सामायिक दिवे यांना विदयुत जनित्र संचाची ( जनरेटची ) जोडणी असावी. | या मुद्दयांची पुनर्वसन इमारतीत पुर्तता करण्यात येईल. | मुंबई मंडळ |
| १५. | वरळी बीडीडी चाळ परिसरात रहिवाशासाठी तयार करण्यात येणा-या सॅम्पल प्लॅट सोबत संपूर्ण वरळी बीडीडी पुर्नविकास प्रकल्पाचे मॉडेल ठेवण्याबाबत. | प्रकल्पांचे मॉडेल ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. | मुंबई मंडळ |
| १६. | प्रकल्पाचे माहितीपुस्तक तयार करुन त्याचे वितरण भाडेकरुंना करण्यात यावे. | यापूर्वीही नायगांव व ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ परिसरातील स्थानीक रहिवाशांना प्रकल्प माहितीपुस्तके वितरीत करण्यात आली आहेत. व प्रत्यक्ष प्रकल्प जागेवर प्रकल्प माहिती दर्शविणारे फलक उभारण्यात आले आहेत. यांप्रमाणेच वरळी येथील बीडीडी चाळ प्रकल्पांत कार्यवाही करण्यात यावी. | मुंबई मंडळ |
| १७. | बीडीडी चाळीतील भाडेकरुंचे प्रलंबित हस्तांतरण व खरेदी- विक्री प्रकरणांवर प्राधान्याने कार्यवाही करावी. | सदरील कार्यवाही युद्ध पातळीवर येत्या एक महिन्यात पूर्ण करावी. | संचालक. बीडीडी चाळ |

| अ. क्र. | प्रकल्पांबाबत उपस्थित मुद्दे | मा. सभापती यांचे निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १८. | धार्मिक स्थळांचे स्थलांतरण. | प्रकल्प टप्प्यात आवश्यक असलेल्या धार्मिक स्थळांच्या स्थलांतरणावेळी संस्थेच्या पदाधिका-यांना आवश्यक तपशील उपलब्ध करुन दिला जाईल व स्थलांतरणाबाबत आवश्यक कार्यवाही प्रचलित शासन नियमावलीनुसार केली जाईल. | मुंबई मंडळ |
| १९. | बीडीडी चाळ पुर्नविकास प्रकल्पाला विरोध करणा-यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. | बीडीडी चाळ पुर्नविकास प्रकल्पातील पात्रता निश्चिती सर्वेक्षणावेळी कामात अडथळे आणणा-या व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. | सक्षम प्राधिकारी, नायगांव बीडीडी चाळ तथा उपजिल्हाधिकारी ( अति. /निष्का.) धारावी विभाग, सक्षम प्राधिकारी, ना.म.जोशी मार्ग बीडीडी चाळ तथा उपजिल्हाधिकारी ( अति./निष्का.) कुलाबा विभाग |
| २०. | ना.म.जोशी मार्ग बीडीडी परिसरातील पहिल्या टप्यातील कामगार कल्याण विभागाची तीन बांधकामे ताब्यात घेऊन पुर्नविकासासाठी कार्यवाही व्हावी. | ना.म.जोशी मार्ग बीडीडी चाळ परिसरातील कामगार कल्याण विभागाची बांधकामे रिक्त करुन म्हाडास पुर्नविकासासाठी हस्तांतरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे व लवकरच पहिल्या टप्प्यातील बांधकामे रिक्त करुन म्हाडास हस्तांतरित केली जातील असे उपस्थित कामगार कल्याण विभागाच्या अधिका-याने नमूद केली आहे. यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही युद्ध पातळीवर व्हावी. | आयुक्त कामगार कल्याण विभाग |
| २१. | पुर्नविकास प्रकल्पातील फेज -१ मध्ये समाविष्ट नसलेल्या बीडीडी चाळींची वेळोवेळी दुरुस्ती व्हावी. | नायगांव, ना.म.जोशी मार्ग व वरळी येथील बीडीडी चाळींना दुरुस्ती व देखभालीची आवश्यकता आहे. बीडीडी चाळ पुर्नविकास प्रकल्प टप्याने राबविण्यात येणार असल्याने प्रचलित टप्प्यात समाविष्ट नसलेल्या बीडीडी चाळींची आवश्यक दुरुस्ती व देखभाल करण्यात यावी जेणेकरुन स्थानिक रहिवाशांच्या जीवास धोका निर्माण होणार नाही. | संचालक, बीडीडी चाळ |

| अ. क्र. | प्रकल्पांबाबत उपस्थित मुद्दे | मा. सभापती यांचे निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| २२. | ना.म.जोशी मार्ग येथे ५६० भाडेकरुंनी पैकी ४०८ भाडेकरु पात्र आहेत. इतर भाडेकरुमध्ये अनिर्णित रहिवाशांकडुन कागदपत्रे अप्राप्त असणे, ५३ भाडेकरुंचा सर्वेक्षणास विरोध असणे. तसेच ७ चाळीं व्यतिरिक्त ७८ स्टॉल्स / झोपडया इत्यादींचे सर्वेक्षण झाले आहे. परंतु अदयाप प्रारुप यादी प्रसिध्द झाली नाही. टप्पा १ मधील सर्व लाभधारकांबाबत पात्रता निश्चितीची कार्यवाही होण्यासाठी कालमर्यादा निश्चित करावी. | ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ परिसरातील पहिल्या टप्प्यात असणा-या सात चाळींतील अनिर्णित भाडेकरुंबाबत पात्रता निश्चिती कार्यवाही येत्या एक महिन्यात पूर्ण करावी तसेच पहिल्या टप्प्यातील ७८ स्टॉल्स / झोपडयांची पात्रता निश्चिती कार्यवाही येत्या एका महिन्यात पूर्ण करावी जेणेकरुन पहिल्या टप्प्यातील प्रकल्प बांधकाम त्वरीत हाती घेणे शक्य होईल. | सक्षम प्राधिकार ना.म.जोशी मार्ग बीडीड चाळ तथ उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाब विभाग |
| २३. | बीडीडी चाळींच्या परिसरात अनधिकृत स्टॉल्स व झोपडीपट्टीधारक यांच्या वाढत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर कोणाचेच नियंत्रण राहिलेले नाही व त्यांची संख्या झपाटयाने वाढत असूनसुध्दा त्यांच्यावर संचालक बीडीडी व मुंबई महानगर पालिका यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही ज्यामुळे बीडीडी प्रकल्पाला खिळ बसण्याची शक्यता आहे. | बीडीडी चाळ परिसरातील चाळी पुर्नविकासासाठी तोडण्यात येईपर्यंत त्यांच्या देखभाल दुरुस्तीची कामे तसेच मिळकत व्यवथापनासंबंधी कामे जसे की, भाडेवसुली, वारसा हस्तांतरण प्रकरणे, अनधिकृत गाळे हस्तांतरण प्रकरण, अनधिकृत स्टॉल्स व बांधकामे इ. बाबतची कार्यवाही संचालक बीडीडी यांना सोपविण्यात आली आहेत. अनधिकृत स्टॉल्स नियमित करण्याचे अधिकार शासनाकडे आहेत. यापूर्वीही काही स्टॉल्सचे नियमितीकरण शासनाने केले आहेत. त्याप्रमाणे संचालक बीडीडी यांनी स्टॉल्सच्या नियमितीकरणाची कार्यवाही करावी. बीडीडी चाळ परिसरातील वाढते अनधिकृत स्टॉल्स व बांधकामे यांचा विचार करुन म्हाडामार्फत नायगाव, ना.म.जोशी मार्ग व वरळी या तिनही चाळींच्या परिसराचे video shooting करण्यात आले व त्याची सॉफट कॉपी संचालक बीडीडी यांचेकडे सादर करण्यात आली आहे व संचालक बीडीडी यांना सदर विषयी वेळोवेळी सुचित करण्यात आले आहे. या अनधिकृत स्टॉल व बांधकामाबाबत संचालक बीडीडी यांनी युध्द पातळीवर कार्यवाही करावी जेणेकरुन बीडीडी चाळींच्या पुर्नविकास प्रकल्पावर परिणाम होणार नाही. | संचालक बीडीडी |

0080

| अ. क्र. | प्रकल्पांबाबत उपस्थित मुद्दे | मा. सभापती यांचे निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| २४. | नायगाव, ना.म.जोशी मार्ग व वरळी येथील बीडीडी चाळींतील गाळयांची संख्या, अनिवासी गाळयांची यादी, भाडेकरुंची यादी, अनधिकृत बांधकामांची यादी, धार्मिक स्थळांची यादी, भाडेदारी हस्तांतरण आदेश व करारनामा, व प्रकल्पासाठी आवश्यक इतर तपशील सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करावा. | नायगाव, ना.म.जोशी मार्ग व वरळी येथील पुर्नविकास प्रकल्पासाठी सार्वजिनिक बांधकाम विभागाशी संबंधित आवश्यक सर्व तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावा जेणेकरुन भाडेकरुंना, भाडेकरुंच्या विविध संघटनांना व शासकीय विभांगाना मदत होऊ शकेल. | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई व संचालक बीडीडी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग |

उपरोक्त प्रमाणे सर्वाच्या प्रश्नांचे निरासन झाल्यानंतर मा.सभापती महोदय यांनी उपस्थितींचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

मधु चव्हाण

( मधु चव्हाण ) १८/१०/२०१८

सभापती मुंबई मंडळ